Impact Factor - 8.572 (SJIF)
ISSN - 2278 -9308

FEBRUARY 2022
ISSUE NO. (CCCXXXVI) 336

# B.Aadhar

Peer - Reviewed & Refereed Indexed

MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

# मराठी साहित्यातील नवजाणिवा

शोधनिबंध विशेषांक

संपादक

डॉ. जगदीश साबू | डॉ.शिवाजी नागरे | डॉ.श्रीकृष्ण काकडे

This Journal is Indexed in
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit to : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

Scanned with CamScanner

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed
### Multidisciplinary International Research Journal

## February,2022

ISSUE No- (CCCXXXVI ) 336

# मराठी साहित्यातील नवजाणिवा

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

प्रा.डॉ. शिवाजी नागरे
प्रा. डॉ. श्रीकृष्ण काकडे
संपादक
मराठी विभाग,
शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अकोला.

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

ISSN : 2278-9308
February, 2022

# Editorial Board

**Chief Editor -**

**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** . Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** . Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro. Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,Government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal . Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande,** Professor Dr. P. D. College of Law, Amravati]
- **Dr. Sandip B. Kale,** Head, Dept. of Pol. Sci., Yeshwant Mahavidyalaya, Seloo, Dist. Wardha.
- **Dr. Hrushikesh Dalai** . Asstt. Professor K.K. Sanskrit University, Ramtek

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responicible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**
**Prof.Virag Gawande**
**Aadhar Publication** ,Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati
( M.S ) India Pin- 444604 **Email :** aadharpublication@gmail.com
**Website :** www.aadharsocial.com **Mobile : 9595560278 /**



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 41 | गोरबंजारा लोकसाहित्यातील जीवनमूल्ये आणि जाणीवा नेमीचंद चव्हाण | 201 |
| 42 | नवजाणिवांच्या साहित्यातील वेगळेपणा: बंजारा स्त्रीउर्जेची हेळसांड डॉ. विजय जाधव | 209 |
| 43 | रक्त आटवणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांची परवड : मास्तर मातीचे प्रा.डॉ. राजकुमार मुसणे | 214 |
| 44 | नवोदोत्तर मराठी ग्रामीण कवितेचे बदलते स्वरूप प्रा. डॉ.शरद वाघोळे | 220 |
| 45 | मराठी साहित्य प्रवाहात जनसाहित्याचे योगदान प्रा.डॉ. दिनेशचंद्र की. राऊत | 223 |
| 46 | जागतिकीकरण आणि ग्रामीण समाजव्यवस्था डॉ. अनंता सूर | 227 |
| 47 | मराठीतील निवडक नव्वदोत्तरी स्त्री लेखिकांची कथासृष्टी : एक चिकित्सक अभ्यास. प्रा डॉ स्वाती दीपक दामोदरे | 233 |
| 48 | स्त्रीवादी साहित्याचे नव्याने आकलन प्रा. डॉ मीनाक्षी पुंडलिक पाटील | 238 |
| 49 | २००० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेतील बदलते जीवन संदर्भ प्रा. डॉ. सुर्यकांत हरिश्चंद्र गित्ते | 242 |
| 50 | एकविसाव्या शतकातील मराठी कथा प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | 247 |
| 51 | संत ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातील 'स्त्री' प्रतिमांचे वैशिष्ट्ये श्री. संदिप कडूभाऊ तांबे | 253 |
| 52 | संत साहित्यातील समाज प्रबोधन व नवमूल्यजाणिवा : एक शोध प्रा. डॉ. हरिदास देविदास आखरे | 258 |
| 53 | एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी साहित्यातील बदलते स्त्रीजीवन डॉ.सुवर्णा रा. गाडगे | 262 |
| 54 | स्त्रीवादी साहित्यातील बदलते स्त्रीजीवन प्रा. नितेश रा. थोरात / प्रा. डॉ. माधुरी म पाटील | 268 |
| 55 | नवजाणिवांचा साहित्यातील आविष्कार प्रा.डॉ. गजानन गोपळराव हेरोळे | 272 |
| 56 | संत चोखामेळा यांचे साहित्यातील समाजदर्शन डॉ.विनोद अवधूतराव कोकणे | 275 |
| 57 | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या आत्मचरित्रातील बदललेल्या मूल्यांचा प्रभाव (दलित भटक्या—विमुक्त आणि आदिवासी) प्रा.डॉ.कल्पना गोरले | 278 |
| 58 | बदलत्या कृषी संस्कृतीचा आलेख : सदानंद देशमुख यांची कादंबरी प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे | 281 |
| 59 | २१ व्या शतकाच्या बदलत्या परिप्रेक्षातील ग्रामीण कादंबरी प्रा.डॉ.विनोद नामदेव इंगळे | 284 |




Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.572 Issue NO, 336 (CCCXXXVI)
ISSN : 2278-9308
February, 2022

# स्त्रीवादी साहित्याचे नव्याने आकलन

प्रा. डॉ मीनाक्षी पुंडलिक पाटील
मराठी विभाग प्रमुख महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, मालेगाव
9422031401

**प्रस्तावना :**

साहित्यातील स्त्री-पुरुष या नैसर्गिक निर्मितीचा विचार केला तर लिंग व लिंग भाव या दोन मुख्य संकल्पना चा विचार करणे गरजेचे वाटते. लिंग हे जीवशास्त्रीय आहे. लिंगभाव हा सांस्कृतिक असून मनुष्यनिर्मित आहे. तो भूमिका, गुण, वर्तन प्रकार व जबाबदाऱ्या आदींची स्त्री उचित आणि पुरुष उचित अशी विभागणी करतो. लिंगभाव बदलता असतो. काळ, संस्कृती इतकेच काय कुटुंबा कुटुंबामध्ये तो बदलतो म्हणजे लिंगभाव बदलता येतो. प्रत्यक्षात नैसर्गिक आणि समाज निर्मित असा फरक करणे अवघड असते. जन्मानंतर लगेच कुटुंबाकडून आणि समाजाकडून मुलांवर लिंग भावात्मक संस्कार बिंबवण्यात सुरुवात होते. दक्षिण आशियाई देशांमध्ये मुलाचा जन्म झाला की आनंद साजरा केला जातो तर मुलगी जन्मली की शोक करतात; परंतु हा लिंगभाव स्थळ परिस्थिती बदलली की बदललेला दिसतो. पुरुषाने व्यापार-उदीम, राजकारण, धर्मकारण व व्यवसाय या क्षेत्रात कार्यरत असावे अशी अपेक्षा असते तर या उलट स्त्रीने मुलांना जन्म द्यावा, त्यांचा सांभाळ व संस्कार करावेत. घरातील सर्वांचे सेवा करावी, इतर कार्य करावीत असे मानले जाते. हा लिंगभाव परिवर्तनीय आहे असे म्हणतात. कारण विविध कुटूंबात व समूहात तो भिन्न असतो. इतकेच नव्हे तर त्याच्या कुटुंबात वेगवेगळ्या काळातही लिंगभाव वेगळा असतो. स्त्री आणि पुरुषांच्या दर्जा तला फरक आहे तो संपूर्णतः समाज व संस्कृती निर्मित आहे. त्याचा निसर्गाशी काहीएक संबंध नाही.

**स्त्रीवाद संकल्पना व स्वरूप:**

'स्त्री' या केंद्र बिंदूभोवती ' स्त्रीवाद' ही संकल्पना फिरताना दिसते. स्त्रीच्या दृष्टिकोनातून स्त्री जीवनाच्या सर्व पैलूंवर टाकलेला दृष्टिक्षेप म्हणजे 'स्त्रीवाद'. स्त्रीवादही एक जाणीव आहे. स्त्री जीवन विषयक ते तत्वज्ञान आहे.' स्त्री-पुरुषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार आणि पुनर्रचना म्हणजे स्त्रीवाद'. ही एक स्त्रीवादाची व्याख्या आहे. तसेच स्त्रीवादी साहित्य लिहिणाऱ्या लेखिकांचा एकसंघ गट नसला तरी1975 ते 1985 या काळातील स्त्रियांच्या लेखनातून स्त्रीवादी जाणिवा प्रकर्षाने आढळतात म्हणून त्यांच्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हटले जाऊ लागले. 'लिंगाधारित वाचन म्हणजे स्त्रीवादी समीक्षा ' अशीही एक व्याख्या आहे.

मानवमुक्तीच्या लढ्यात स्त्री प्रश्नांचा रेटा लावणे हादेखील स्त्रीवादाचा भाग आहे. स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून तिच्या अनुभवातून एखाद्या प्रश्नाची उकल करणे व स्पष्ट मांडणी करणे हे स्त्रीवादात अभिप्रेत आहे. इसवी सन1975 या वर्षी आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे झाले. याच्यापुढे ही दशकभर व्याख्याने ,परिसंवाद, चर्चा, लेखन, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींमधून स्त्रीमुक्तीच्या जाणीव जागृत विषय प्रयत्न होत होते. याचा परिणाम स्त्रियांच्या जाणिवा वर होणे व त्याची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी काही अंशाने का होईना पण बदलणे स्वाभाविक होते. याच काळात आपल्याकडे स्त्रीवाद ही संकल्पना ज्ञात होऊ लागली. तिचा प्रचार व प्रसार होऊ लागला. स्त्रियांच्या जाणीवा मध्ये बदल होऊ लागला. त्या व्यक्त होऊ लागल्या. संख्या जास्त नसली तरी कमी प्रमाणात का होईना



Scanned with CamScanner

स्त्रीवाद ही संकल्पना स्त्रियांमध्ये त्यांच्या जाणिवा मध्ये मूळ धरू लागली. वांग्मयीन आणि सौंदर्यशास्त्रीय पातळीवरही याचा शोध घेण्याची दृष्टी निर्माण झाली. मराठी क्षेत्रावरही स्त्रीवादी विचारांचा प्रभाव पडत गेलेला दिसतो. तसेच स्त्रियांच्या कथांमधून, कवितांमधून, आत्मकथन मधून स्त्रीवादी जाणिवा वाढत गेलेल्या दिसतात. पाश्चात्य स्त्रीवादी भूमिका यांच्याशी संवाद साधत, स्त्रीवादी समीक्षा ही उपयोजनात्मक मार्गक्रमण करताना दिसते. या समीक्षेने समाज संस्कृतीच्या परंपरांनी लादलेल्या दुय्यम असल्याचा दस्तावेज शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्त्री-पुरुष विषयी पारंपारिक गृहीत कल्पनांना तडे दिलेले आहेत. स्त्री मनावर चढलेली पुरुषसापेक्ष तेचि पुढेही अनेक कारणे शोधले आहे. काळाच्या परिवर्तनात लेखिकांच्या साहित्यातून प्रकट होणाऱ्या नव्या जाणीवही शोधल्या गेल्या. मराठीतील स्त्रीवादी साहित्याचा अभ्यास करताना स्त्रीयांच्या वाट्याला आलेली लैंगिक विषमता व अन्याय यांचा इतिहास काळापासून अभ्यासकांनी शोध घेतला असल्याचे लक्षात आले. भारतातील स्त्री चळवळीने एकोणिसाव्या शतकातील स्त्री सुधारणा चळवळीपासून प्रारंभ झालेला आहे.

स्त्रीवाद ही संज्ञा आपल्याकडे पाश्चात्त्य feminisam वरून आलेली असली तरी स्त्रीवादी जाणीव इसवी सन1882 ताराबाई शिंदे यांच्या स्त्रीपुरुष तुलना या ग्रंथामधून व्यक्त झाली. अनेक स्त्रियांपर्यंत ती पोहोचली. स्त्रिया विचार करू लागल्या. ताराबाईंनी मांडलेले मुद्दे वास्तव परिस्थितीला धरून होते त्यामुळे त्याचा स्त्री जीवनावर मोठा परिणाम झाला. स्त्री- पुरुष तुलना यासंदर्भात संपादक विलास खोले यांनी मत प्रतिपादन केले आहे की या पुस्तकात स्त्री-पुरुषांमधील सारा असमतोल दूर करून स्त्रीजातीला पुरता न्याय मिळवून द्यावा अशी खटपट आहे. विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात ही विभावरी शिरूरकर यांच्या साहित्यातून स्त्रीवादी जाणिवांचे विशेष प्रकट झालेले दिसतात. स्त्रीवादी जाणीव यातून साहित्य निर्मिती करणारी लेखिका म्हणून मराठी वांग्मयाचा इतिहास मध्ये विभावरी शिरूरकर यांचे निर्धारण करावे लागते. असा निष्कर्ष त्यांच्या संदर्भात उषा शिंदे या अभ्यासकांनी काढला आहे. असे तुरळक स्त्रीवादी जाणिवा प्रकट करणारे लेखन पुढच्या काळात तर जवळपास दिसत नाही. पुढे जवळजवळ1975 नंतर स्त्रीवादी जाणिवा दिसू लागतात. ज्योती म्हापसेकर यांच्या ' मुलगी झाली हो' या मुक्त नाट्याचे असंख्य प्रयोग होऊन स्त्री-मुक्ती चळवळीला मोठे वळण लाभले.स्त्री प्रश्नांची चर्चा करणारी बया, बायजा, मिळून साऱ्याजणी, स्त्री -ऊवाच ही नियतकालिके सुरू झाली. त्यातून वांग्मय अभिरुचीला नवे परिमाण देण्याचे प्रयत्न होऊ लागले. त्याला नवे परिमाण देखील लाभले. लेखनामुळे इतर स्त्रियांमध्ये जागृती होऊ लागली. जेणेकरून स्त्रीवादाला एक नावे व्यासपीठ निर्माण होऊ लागले. स्त्रिया वाचू लागल्या. विचार करू लागल्या. केलेला विचार कृतीत आणण्याचा त्या प्रयत्न करू लागल्या. पाश्चात्त्य स्त्रीवादी भूमिकेशी संवाद साधत येथील स्त्रीवादी जाणिवा वृत्तपत्रीय लेखांमधून, स्त्रीविषयक मासिकांमधून, इतर नियतकालिकांमधून कधी वैचारिक तर कधी साहित्य स्वरूपात प्रकट होऊ लागल्या.

1975 नंतरच्या काळातील स्त्रियांच्या कथांमधून अनेक स्त्रीवादी जाणिवा जागोजागी विखुरलेल्या दिसून येतात. समकालीन मराठी कथा लेखिकांमध्ये गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडुलकर, कुलकर्णी, कमल देसाई, निर्मला देशपांडे, सरिता पत्की, विजया राजाध्यक्ष, अंबिका सरकार, उर्मिला शिरूर, आशा बगे, पद्मिनी बिनीवाले, प्रतिमा इंगोले इत्यादी लेखिकांच्या कथांमधून स्त्रीकेंद्री सहिता आणि स्त्रीवादी विशेष यांचा प्रत्यय अनेक ठिकाणी येतो. या लेखिकांच्या सर्व कथांमध्ये स्त्रिया ह्या केंद्रस्थानी असल्यामुळे स्त्रियांना आपल्या एक नवे जग सापडले. त्यामध्ये त्यांना स्वतःचे आयुष्य दिसू लागले. त्यामुळे त्या अन्याय अत्याचाराला विरोध करू लागल्या. स्वतःच्या भावनांना महत्त्व देऊ लागले. यामुळे समाज उन्नत होण्यास मदत होत गेली. स्त्री मुक्ती चळवळीनंतर पिढीतल्या स्त्रियांच्या कवितांच्या अवलोकन आत स्त्रीवादी वैशिष्ट्यांचा प्रकर्षाने प्रत्यय येतो. या काळातील नीरजा, मल्लिका अमर शेख, रजनी परुळेकर, प्रभा गणोरकर, अनुराधा पाटील, अरुणा ढेरे, प्रज्ञा लोखंडे, अश्विनी धोंडगे, अंजली



Scanned with CamScanner

3. वरखेडे मंगला, स्त्रियांची नवकथा वाटा आणि वळणे, कैलास राणा प्रकाशन नाशिक, प्रथमावृत्ती 1996, प्रस्तावना
4. कर्वे स्वाती- संपादक, स्त्री विकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती,2008, पृष्ठ-382
5. पाटील शोभा, स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2007, पृष्ठ-126,127



Scanned with CamScanner